अग्रलेखांचा बादशहा नवा काळ

संस्थापक : नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवा काळ

।। न मे भक्त: प्रणश्यति ।।

अग्रलेखांचा बादशहा नवा काळ

# इंग्रजीचा लॉलीपॉप चघळणाऱ्यांची ही गुलामीच

भारत हा सर्वाधिक विविध भाषा बोलणारा जगातला एकमेव देश असावा. ही परिस्थिती लक्षात घेऊनच आपल्या देशाने हिंदी ही राष्ट्रभाषा नक्की केली आणि आज जवळपास देशाच्या ऐंशी टक्के भागामध्ये हिंदी भाषेचा वापर होतो. सर्वप्रकारचे व्यवहार आणि सरकारी कामकाज करणेही सोपे जाते. हिंदीचा लोकांनीदेखील तितक्याच सन्मानाने स्वीकार केला आहे. दक्षिण भारतातले काही दोन चार प्रांत वगळले तर हिंदी ही सहजपणे वापरता येणारी भाषा ठरली आहे.आज मात्र केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेमध्ये हिंदीचा आग्रह धरणाऱ्यांना दोष दिला जात आहे. यूपीएससीच्या पूर्वपरीक्षेत एक ॲप्टीट्यूड टेस्ट घेतली जाते. तिचे इंग्रजी माध्यम असते. तसेच काही विषयदेखील इंग्रजीतूनच लिहावे लागतात. त्याला विद्यार्थ्यांनी विरोध सुरू केला आहे. ॲप्टीट्यूड टेस्ट देत असताना त्याला हिंदी भाषेचा पर्याय असावा, अशी त्यांची मागणी आहे. यावर गेले काही दिवस दिल्लीमध्ये आंदोलन सुरू आहे. यावर तोडगा म्हणून सरकारने इंग्रजी विषयातले गुण अंतिम गुणवत्ता यादीमध्ये ग्राह्य धरले जाणार नाहीत, असा निर्णय दिला. त्यामुळे अनेक सनदी अधिकाऱ्यांच्या पोटातले पित्त खवळलेले दिसते. महाराष्ट्रातल्या अनेक आजी-माजी सनदी अधिकाऱ्यांनी या विषयावर तोंडसुख घेण्याचा प्रयत्न केला आणि इंग्रजीला डावलण्याचा सरकारचा निर्णय आत्मघातकी असण्याचा आरोपही केला. या परीक्षेत उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांना देशातल्या वेगवेगळ्या प्रांतांमध्ये काम करावे लागते. अनेक प्रसंगी त्यांच्या परदेशातही नियुक्त्या होतात. अशा परिस्थितीत त्यांचे इंग्रजी चांगले असणे आवश्यक ठरते. अशा प्रकारचे कारण देऊन या सनदी अधिकाऱ्यांनी आपला इंग्रजीधार्जिणेपणाच दाखवला किंबहुना इंग्रजी येत नसेल तर भारतीय तरुण जगात टिकाव धरू शकणार नाहीत अशा प्रकारचा न्यूनगंड जोपासण्याचेच काम त्यांनी केले आहे. परंतु ही परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांचा सरसकट इंग्रजीला विरोध नाही त्यांनी या भाषेची परीक्षा अधिक सोप्या पध्दतीने घेण्याची मागणी केली आहे. एवढेच नव्हे तर परीक्षेत उत्तीर्ण झाल्यानंतर त्या विद्यार्थ्यांना इंग्रजीचे विशेष प्रशिक्षण दिले जावे; परंतु परीक्षेत इंग्रजीची सक्ती करून त्यांचे भवितव्य रोखण्याचा प्रयत्न होऊ नये अशी त्यांची साधीसरळ तक्रार आहे. हिंदी ही राष्ट्रभाषा असल्यामुळे त्यांनी हिंदीचा आग्रह धरणे यात काहीच वावगे नाही. ती लादण्याचा कोणताही हेतू दिसत नाही. असे असताना काही इंग्रजी प्रसारमाध्यमे स्वत:च्याच स्वार्थासाठी या आंदोलनाला हिंदी भाषिक राजकीय रंग देण्याचा प्रयत्न करीत आहेत. यामध्ये सनदी अधिकाऱ्यांनी मधेच तोंड खुपसून हिंदीला कमी लेखण्याचा आणि इंग्रजीला डोक्यावर घेण्याचा प्रयत्न करावा हे आणखीनच दुर्दैवाचे ठरते.

### सनदी अधिकाऱ्यांचे इंग्रजीचे कवित्व

आज जगाचा विचार केला तर सगळी प्रगत आणि मोठी राष्ट्रे आपल्या मातृभाषेचाच आग्रह धरतात. फ्रेन्च, चिनी जपानी, स्पॅनिश, अनेक ठिकाणी तर ऊर्दू भाषेचाही आग्रह धरला जातो. त्यांच्या अनेक परीक्षा त्याच भाषेतून होतात आता या देशामध्ये भारतासारखी विविधता नाही. चीनमध्ये जवळजवळ ९० ते ९५ टक्के लोक चिनी भाषा बोलतात. तोच प्रकार फ्रेन्च जर्मनीबाबत आहे. भारतात तशी परिस्थिती नाही. इथल्या वेगवेगळ्या राज्यांमध्ये इथे भाषावार प्रांतरचना निर्माण केली गेली. भाषेचे आणि त्याला जोडून येणाऱ्या संस्कृतीचे वैशिष्ट्य मान्य केले गेले. परंतु हे करत असताना कुठेही हिंदीची किंवा इंग्रजीची सक्ती होईल, असा आग्रह धरला गेला नाही. केवळ देशाच्या सोयीसाठी किंवा एकूण लोकव्यवहार सुलभ व्हावा, विचारांचे आदान-प्रदान सहजगत्या करता यावे. म्हणून त्यातल्या त्यात देशात सर्वाधिक बोलली जाणारी आणि तितक्याच सहजगत्या अवगत होणारी भाषा म्हणून हिंदीचा पुरस्कार केला गेला. देशाचा साठ टक्के भाग अजूनही ग्रामीण स्वरूपाचा आहे. केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेला बसणाऱ्या या ग्रामीण भागातल्या विद्यार्थ्याला त्यातल्या त्यात हिंदी भाषा सोयीची वाटते. त्याला इंग्रजी भाषा त्याप्रमाणात बोलता किंवा वाचता येत नाही आणि केवळ या एका कारणासाठी त्याचे आयएएस किंवा आयपीएस होण्याचे स्वप्न भंग होत असेल तर तो त्याच्यावर अन्यायच म्हणावा लागेल. उलट अशा परीक्षांसाठी इंग्रजीची सक्ती मोडून काढली पाहिजे. मुळात इंग्रजी ही काही आपली भाषा नाही.ती जरी आज जागतिक भाषा असली तरी तिच्यासाठी लोकांनी माना टाकाव्यात अशी कोणतीही गरज नाही. आपल्या भाषेचा सन्मान ठेवून इंग्रजीचे भान बाळगता येऊ शकते. परंतु इंग्रजी येत नसेल तर हिंदीचा काही उपयोग नाही.अशा प्रकारची नकारात्मक मनोवृत्ती तिथेच ठेचली पाहिजे.आज महाराष्ट्रातल्या ज्या सनदी अधिकाऱ्यांना इंग्रजीच्या कौतुकाचा कंठ फुटला आहे तो जरा त्यांनी तपासून पाहावा. मुळात ही सगळी मंडळी शहरी भागातून शिक्षण घेतलेली आहेच. सर्व प्रकारच्या सोयीसुविधा त्यांना मिळाल्या आहेत. त्यांना इंग्रजीचा हा लॉलीपॉप चघळायला नेहमीच गोड वाटत आला. अर्थात त्यांचेही इंग्रजी फार उच्च दर्जाचे आहे असे नाही.परंतु हिंदीला चाप लावायचा आणि इंग्रजीचा लॉलीपॉप चघळायचा ही गुलामी वृत्ती मुळातच भारताला परवडणारी नाही.

### महाराष्ट्रात मराठीची पिछेहाट

आज राष्ट्रभाषेवर तर असा अन्याय होतोच, पण मातृभाषेचीसुध्दा या इंग्रजीने गळचेपी सुरू केली आहे. महाराष्ट्रामध्ये ज्या मराठीचे अनंत उपकार आहेत ती मराठी भाषा शेवटच्या घटका मोजू लागली आहे की काय असे वाटू लागते. इंग्रजी माध्यमाच्या शाळांनी इतका काही धुमाकूळ घातला आहे की, मराठी ही परकीय भाषा ठरावी इतकी त्याची वाताहत करणे सुरू आहे. अगदी ठिकठिकाणी मराठी शाळा बंद पडण्याचे प्रमाण असेल किंवा शिष्यवृत्तीच्या परीक्षांमध्ये मराठी माध्यमाच्या विद्यार्थ्यांची प्रचंड पिछेहाट असेल या सगळ्या गोष्टी इंग्रजीच्या प्रभावामुळे निर्माण होत आहेत. इंग्रजीचा मराठी माणसाने कधीही दुस्वास केला नाही ती जागतिक भाषा आहे. ती आपल्याला आली पाहिजे याचे पुरेसे भान अनेकांना असते. परंतु दुर्दैवाने आज इंग्रजी येत असेल तरच जगामध्ये तुमचा सन्मान आहे नाहीतर जागोजागी अपमान आहे असे चित्र निर्माण करून स्थानिक संस्कृतीचे अस्मितेचे एवढेच नव्हे तर इतिहासाचेदेखील नकळतपणे खच्चीकरण केले जात आहे. या सगळ्या धोक्यांचा विचार केला तर इंग्रजीचा हा अनाठायी आग्रह कुठेतरी रोखला पाहिजे.